**ठळक बातम्या**

- मुंबईत पोलिसांसाठी ४५ हजार घरं बांधण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- उद्धव ठाकरेंचा पक्ष मुंबईच्या महापौर पदासाठी आशावादी तर महायुतीचा महापौर होणार, असा विश्वास मुख्यमंत्र्यांकडून व्यक्त
- महापालिका निवडणुकांनंतर काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षातले वाद चव्हाट्यावर

**आणि**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका मतपत्रिकेवर घेण्याची काँग्रेसची मागणी

**<><><><><>**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मुंबई पोलिसांसाठी सुमारे ४५ हजार घरं बांधण्याचा निर्णय झाला. या आणि इतर निर्णयांविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**व्हीसी..(१,१४ सेकंद)**

*(मुंबई शहर आणि उपनगरातल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकार आता ४० ते ४५ हजार घरं बांधणार असून यासाठीच्या मुंबई पोलीस गृहप्रकल्पाला आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून हा प्रकल्प उभारण्यात येईल. पाच कोटी चौरसफूट क्षेत्रफळात हा प्रकल्प तयार होणार असून त्याला अंदाजे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.*

*मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या शिवडी न्हावाशेवा अटल सेतूवरच्या टोलशुल्कात पन्नास टक्के सवलत आणखी वर्षभर कायम ठेवण्याचा निर्णय कायम आजच्या बैठकीत झाला. इलेक्ट्रिक मोटार, बस यांनाही अटल सेतूवर टोलशुल्कातून पूर्ण सूट मिळेल. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सुधारित वित्तीय आराखड्यालाही आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यापूर्वीचा आराखडा ५ हजार ३०० कोटी रुपये इतका होता, तो आता ८ हजार ८७ कोटी ११ लाख इतका करण्यात आला आहे. भाजीपाला निर्यातीकरता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यात मौजे बापगांव इथे मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषी पणन महामंडळाला ७ हेक्टर जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डला श्री पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी वाटप केलेला भूखंड एक रुपया प्रति चौरस मीटर दराने द्यायला आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. )*

<><><><><>

मुंबईत बहुमताचा आकडा पार करण्यात अपयश आलं असली तरी मुंबईच्या महापौरपदावरची आशा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोडलेली नाही. देवाची इच्छा असेल तर मुंबईत आपला महापौर होईल, असं वक्तव्य त्यांनी मुंबईत नव्यानं निवडून आलेल्या नगरसेवकांशी बोलताना केलं.

मुंबईकरांकडून अधिक अपेक्षा होती, तरी मिळालेलं यशही कमी नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी वार्ताहर परिषदेत दिली. कागदावरची शिवसेना संपवली असली तरी जमिनीवरची शिवसेना अजून संपलेली नसल्याचं ते यावेळी म्हणाले. या निवडणुकीत झालेल्या पैशाच्या वापराबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

दरम्यान एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या मुंबईतल्या नगरसेवकांना वांद्र्यातल्या हॉटेलमध्ये ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईचं महापौरपद अडीच-अडीच वर्षांसाठी वाटून देण्याची मागणी शिंदे यांच्या काही नेत्यांनी भाजपाकडे केल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबईत भाजपाला जेवढ्या जागा मिळाल्या आहेत, तेवढ्या शिवसेनेला गेल्या तीन निवडणुकांमध्येही मिळाल्या नव्हत्या. आता मुंबईचा महापौर कोण होणार हे शिवसेनेसोबत बसून ठरवणार आहोत, त्यात काहीही वाद नाहीत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं. मुंबईला जगातलं सर्वोत्तम शहर म्हणून प्रस्थापित करायचं भाजपाचं ध्येय आहे. एकही मराठी माणूस मुंबईबाहेर जाणार नाही, गरीबांना घर देण्याचं धोरण भाजपा राबवणार असल्याचं ते म्हणाले.

सगळे आडाखे मागे सारून भाजपला जो विजय पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिला आहे, त्या विजयाने जबाबदारीचं भान वाढलं आहे. कारण जनतेने विकासावर, भाजपच्या कार्यप्रणालीवर दाखवलेला हा विश्वास आहे. या

विश्वासाला पात्र होण्याकरता जास्त मेहनत करावी लागेल, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

महानगरपालिका निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपाचं अभिनंदन केलं. ते आज पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. पक्षाचे नेते एकत्र बसून निवडणूक निकालाचं विश्लेषण करतील असं पवार म्हणाले. प्रत्येक पक्ष मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असतो, भाजपाने यात लक्षणीय यश मिळवलं आहे, असंही त्यांनी सांगितलं.

त्याआधी बारामती इथं उपमुख्यमंत्री अजित पवार आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. त्यानंतर शरद पवार यांच्या निवासस्थानी दोन्ही पक्षांच्या नेत्यांची बैठक झाली. यात सुप्रिया सुळे, रोहित पवार, शशिकांत शिंदे, दत्तात्रय भरणे उपस्थित होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आगामी जिल्हा परिषदा एकत्र लढवतील या शशिकांत शिंदे यांच्या वक्तव्याबद्दल विचारलं असता याबद्दल आपल्याला काहीही माहिती नाही असं अजित पवार म्हणाले. आघाडी करण्याचे अधिकार स्थानिक पातळीवरच्या नेत्यांना दिल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, निवडणुकीतल्या पराभवाचं आपल्याला आत्मचिंतन करणं गरजेचं आहे, असं खासदार सुप्रिया सुळे बारामतीत वार्ताहरांशी बोलताना म्हणाल्या. मुंबईत ठाकरे बंधूंनी चांगली लढत दिली, मात्र त्यांनी काँग्रेसशी आघाडी केली असती तर अधिक चांगले निकाल आले असते, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

महानगरपालिका निवडणूक निकालानंतर मुंबई काँग्रेसमधला वाद चव्हाट्यावर आला आहे. मुंबई महानगरपालिकेत पक्षाची कामगिरी २०१७च्या तुलनेत वाईट झाल्याचं सांगत मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष भाई जगताप यांनी

विद्यमान अध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. काँग्रेसची मुंबई महानगरपालिका निवडणुकीतली कामगिरी सर्वांत वाईट झाल्याची टीका जगताप यांनी केली आहे.

याप्रकरणी जगताप यांना काँग्रेसने कारणे दाखवा नोटिस बजावली आहे. पक्ष नेतृत्वाबद्दलच्या तक्रारी या पक्षांतर्गत व्यासपीठावर नोंदवायला हव्यात, प्रसारमाध्यम किंवा सार्वजनिक ठिकाणी वक्तव्य करणं हे पक्ष शिस्तीचं उल्लंघन आहे, असं काँग्रेसचे मुंबई आणि कोकण विभागाचे प्रभारी यू. बी. वेंकटेश यांनी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत पक्षाच्या खराब कामगिरीला जबाबदार धरत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी अंबादास दानवे यांच्यावर टीका केली आहे. कार्यकर्ते पक्ष सोडून जात असताना दानवे यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही, असा आरोप त्यांनी केला. दानवे यांनी निवडणूक गांभीर्याने घेतली नाही, आपल्यासहीत कुणालाही विचारात न घेता एकट्याने निर्णय घेतले, असे आरोप खैरे यांनी केले. आतापर्यंत वर्चस्व असलेल्या या महानगरपालिकेत पराभव होणं हे वेदनादायक आहे, असं खैरे म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात आगामी जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेवर घ्याव्यात अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. आपल्या या मागणीसाठी त्यांनी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. राज्यात नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये मतदानाची अल्प टक्केवारी ही जनतेचा निवडणुकीवरचा विश्वास कमी झाल्याचं निदर्शक आहे. देशातल्या अनेक राज्यांनी

मतपत्रिकेवर मतदान करण्याचा निर्णय घेतलेला असताना फक्त महाराष्ट्रात ईव्हीएमचा हट्ट कशासाठी आहे, असा प्रश्नही पटोले यांनी केला आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी पोलिसांनी गुन्ह्यांच्या तपासासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित एक विशेष ॲप विकसित केलं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊ या आमच्या वार्ताहराकडून…

***होल्ड… व्हीसी- अनिकेत कोनकर(२५ सेकंद)***

**<><><><><>**

पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकलिंग स्पर्धा, पुण्याची 'सायकलींचं शहर' ही ऐतिहासिक ओळख जागतिक स्तरावर पुन्हा एकदा प्रस्थापित करेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केला. या स्पर्धेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. १९ ते २३ जानेवारीदरम्यान पुण्यात होणाऱ्या या स्पर्धेत जगभरातल्या ३५ संघांमधले १७० सायकलपटू सहभागी होणार आहेत. चार टप्प्यांची ही खडतर स्पर्धा ४३७ किलोमीटरच्या मार्गावरून होणार असून, पुण्याच्या नागरी परिसरातून, वारसा स्थळांमधून आणि ग्रामीण प्रदेशातून प्रवास करणार आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातला स्वघोषित धर्मप्रचारक छांगूर बाबा उर्फ जलालुद्दीन उर्फ करीमुल्ला शाह याच्या एका जवळच्या सहकाऱ्याला आज पहाटे नागपूरमधून अटक करण्यात आली. महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशाच्या दहशतवादविरोधी पथकांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीनं ही कारवाई केली.

**<><><><><>**

महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये आज झालेल्या पहिल्या सामन्यात  यु पी वॉरियर्सनं मुंबई इंडियन्सनं वर २२ धावांनी विजय मिळवला.  आजचा  दुसरा सामना संध्याकाळी साडेसात वाजता दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू असा रंगणार आहे. या सामन्यात बंगळुरूनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

शिवसेनेच्या पहिल्या महिला आमदार नीला देसाई यांचं काल रात्री निधन झालं. आज दुपारी ओशिवरा स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नीला देसाई यांनी विधान परिषदेचे सदस्य म्हणून निवडून येत शिवसेनेच्या पहिल्या महिला आमदार होण्याचा मान मिळवला होता.

//<><><><><>//